| MHGA070009312019 |
|---|

| | |
|---|---|
| प्राप्त तारीख | ०४.१२.२०१९ |
| नोंदणी तारीख | ०४.१२.२०१९ |
| निकाल तारीख | ०६.०५.२०२६ |
| कालावधी | **०६ वर्षे ०५ महिने ०२ दिवस** |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

| | |
|---|---|
| | **निशाणी – १५ पुढे** |
| **अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी, यांच्या न्यायालयात, पिठासिन अधिकारी : एस.एम.एच.शाहिद,** | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. **४६/२०१९** **अहेरी** पोलीस ठाणे |
| न्यायनिर्णयाची तारीख | **दि.०६.०५.२०२६** |
| प्रकरण क्रमांक | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ३३६/२०१९** |
| तक्रारकर्ता / अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन तर्फे** ,<br>पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, अहेरी, |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर.एस. उंदिरवाडे** |
| आरोपी | **१.सचिन शंकराराव पुल्लुरवार,**<br>वय ३४ वर्षे, व्यवसाय – किराणा दुकान,<br>रा. एटापल्ली, ता. एटापल्ली<br>जिल्हा गडचिरोली.<br>**२.दिवाकर शंकर नागापुरे,**<br>वय २४ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>राहणार – पंदेवाही, ता. एटापल्ली,<br>जिल्हा गडचिरोली. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **विधीज्ञ श्रीमती जैनवार,**<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

* दि. १४.०७.२०२२ रोजी प्रकाशित राजपत्र क्र. ०८०१/२०२२ नुसारच्या नमुन्यात.

**भाग ब***

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २७.०२.२०१९ |
| पहिल्या खबरीची तारीख | २७.०२.२०१९ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | ०४.१२.२०१९ |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | २७.०१.२०२१ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | २४.०३.२०२१ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ०६.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०६.०५.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | – |

**आरोपीबाबत तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिद्ध की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सचिन शंकराराव पुल्लुरवार | -- | ०४.१२.२०१९ | म.दा.का.चे कलम ६५(अ),८३ अन्वये | **निर्दोष** | – | – |
| २. | दिवाकर शंकर नागापुरे | -- | ०४.१२.२०१९ | म.दा.का.चे कलम ६५(अ),८३ अन्वये | **निर्दोष** | – | |

| **या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील** | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | **फौजदारी संहिता** |
| महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ | **दारुबंदी अधिनियम** |

**भाग क**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्ष:**

| क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र. १ | देविदास मार्कंडी मानकर (**निशाणी १५ पुढे**) | साक्षीदार |
| सा.क्र.२ | तिरूपती अंकुल सल्लावार(**निशाणी १५ पुढे**) | तपासी अधिकारी |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबद्ध दस्तांची यादी**

**अ. अभियोग पक्ष:**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ड. महत्त्वाच्या वस्तु:**

| अ.क्र. | महत्त्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ४६/२०१९ | १. इंपेरियल ब्ल्यु कंपनीचे विदेशी दारूच्या प्रत्येकी १८० एम एल क्षमतेचे ३६० नग सिलबंद बॉटला |

## न्यायनिर्णय

(दिनांकः ०६ मे, २०२६)

१. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, दि.२७.०२.२०१९ रोजी सायंकाळी ०६.०० ते ०६.३० वाजताच्या सुमारास मौजा वांगेपल्ली नदीघाटावर आरोपींनी हिरो स्मार्ट कंपनीची मोटारसायकल क्र.एम एच ३३.पी.२६७३ या वाहनावर काळया बॅगमध्ये इंम्पेरिअल ब्ल्यु कंपनीच्या १८० मिली मापाच्या ३० निपा अवैद्यरित्या दारू बाळगुन वाहतुक करित असतांना मिळून आले. आरोपीचा गुन्हा सिध्द होण्याकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याकरिताचे माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे नमूद केले आहे. आरोपीविरुध्द पुरावा असल्याने तिची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नि.क्र.१४ खाली

नोंदविण्यात आले. आरोपीचा बचाव पुर्णपणे नकारात्मक आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दि.२७.०२.२०१९ रोजी सायंकाळी ०६.०० ते ०६.३० वाजताच्या सुमारास मौजा वांगेपल्ली नदीघाटावर आरोपींनी हिरो स्मार्ट कंपनीची मोटारसायकल क्र.एम एच ३३.पी.२६७३ या वाहनावर काळया बॅगमध्ये इंम्पेरिअल ब्ल्यु कंपनीच्या १८० मिली मापाच्या ३० निपा अवैद्यरित्या दारू बाळगुन वाहतुक करित असतांना मिळून आल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| २ | आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यांत आली. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करिताः**

२. आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने एकूण दोन साक्षीदार तपासले.

३. सा.क्र.१ **देवीदास मानकर** यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.२७.०२.२०१९ रोजी ते अहेरी पोलीस ठाण्यात कार्यरत असतांना दोन व्यक्ती तेलंगाना राज्यातुन वांगेपल्ली नदीघाटमार्गे दारू घेवून येणार असल्याबाबत माहितीमिळाली. सदर माहितीवरून ते व पोलीस कर्मचारी मौजा वांगेपल्ली येथे गेले. गावातुन दोन पंचाना घेवून मोूक्यावर दबा धरून बसले. काही वेळाने तेथे दोन्ही आरोपी मोटारसायकल क्र.एम एच ३३३.पी.२६७३ या वाहनावर काळया बॅगमध्ये इंम्पेरिअल ब्ल्यु कंपनीच्या १८० मिली मापाच्या ३० निपा दारू मिळाली. सदर मुददेमालापैकी एक निप सि.ए.परिक्षणाकरिता सिलबंद केली. मेश्राम यांनी मोक्यावर घटनास्थळ जपतीपंचनामा, मालमत्ता शोध व जप्तीचा नमुना आणि

सि.ऐ. फार्म हे दस्त तयार केले.त्यानंतर आरोपी, त्यांची मोटारसायकल व मुददेमाल पोलीस स्टेशनला आणला. श्री मेश्राम यांनी फिर्याद दिली व फिर्यादवरून आरोपीविरूध्द गुन्हयाची नोंद कण्यात आली. सदर गुनहयाचा तपास श्री सल्लावार यांच्याकडे सोपविला व त्यांचे बयाणे नोंदविले. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी इतर विचारलेल्या सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

४. सा.क्र.२ **तिरूपती सल्लावार** (तपासी अधिकारी) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.२७.०२.२०१९ रोजी ते पोलीस स्टेशन अहेरीला कार्यरत होते. त्यादिवशी प्रभारी अधिका-यांनी अप.क्र.४६/२०१९ कलम ६५(अ) मध्ये त्यांना पुढील तपास सोपविला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे बयाण घेतले. आरोपीविरूध्द अटक कारवाई केली. आरोपीविरूध्द गुन्हा निष्पन्न झाल्याने दोषारोपपत्र दाखल केले.आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी इतर विचारलेल्या सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

५. सरकारी अभियोक्ता तसेच आरोपींतर्फे युक्तिवाद ऐकण्यात आला. तसेच दस्तऐवज व पुराव्याचे अवलोकन केले.

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर प्रकरणात अभियोग पक्षाने दोन साक्षीदार तपासले तसेच फिर्यादी व पंच साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली नाही. सा.क्र.१ व सा.क्र.२ हे पोलिस कर्मचारी आहे. सदर प्रकरणात विदेशी असल्याबाबतचा दर्शविणारा निर्णायक पुरावा म्हणून रासायनिक पृथःकरण अहवाल अभियोगपक्षाने न्यायालयासमोर सादर केला. परंतु, आरोपीविरुध्द सबळ व सुसंगत पुरावा नसल्यामुळे तसेच अभियोगपक्ष आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा संशयाचे पलिकडे सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. म्हणुन आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द होवू शकत नाही. सबब, आरोपी हा सदर प्रकरणातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे, या निष्कर्षाप्रत मी येतो. म्हणून मी मुद्दा क्र.१ ला नकारार्थी उत्तर देतो.

**<u>मुद्दा क्र. २ करिताः</u>**

७. वर चर्चा केल्याप्रमाणे आणि अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द न केल्याने सदर गुन्हयातून त्यांना निर्दोष मुक्त करणे मला न्यायोचित वाटते. सबब, त्याबाबतचे आदेश पारित करणे योग्य होईल. सदर प्रकरणातील जप्त वाहन हे यापुर्वीच सुपुर्तनाम्यावर सोडण्यात आलेले आहेत व अपिल कालावधी संपल्यानंतर सदर वाहनाचा ताबा मुळ मालकाकडे कायम करणे उचित होईल. म्हणून, मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ खालील आदेश पारित करतो.

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्र.१ **सचिन शंकराराव पुल्लुरवार** व आरोपी क्र**.२ दिवाकर शंकर नागापुरे,** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये मुंबई दारुबंदी कायद्याचे कलम ६५(अ),८३ नुसार दंडनिय अपराधातून निर्दोष ठरवून मुक्त करण्यांत येते.

२. आरोपींचे जामीनपत्र रद्द करुन जामीनदाराला मुक्त करण्यांत येते.

३. आरोपींनी फौ.प्र.सं. कलम ४३७–अ अंतर्गत वरिष्ठ न्यायालयात अपिल करिता हजर राहण्याकामी प्रत्येकी रूपये २५,०००/– चा जामीन दाखल करावा.

४. सदर प्रकरणातील जप्त वाहन हे यापुर्वीच सुपुर्तनाम्यावर सोडण्यात आलेले आहेत व अपिल कालावधी संपल्यानंतर सदर वाहनाचा ताबा मुळ मालकाकडे कायम करण्यात यावा.

५. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४५२ नुसार असे आदेशित करण्यात येते की, अपिल कालावधीनंतर यातील जप्त असलेल्या मुद्देमालाची विल्हेवाट राज्य उत्पादन शुल्क विभाग गडचिरोली यांनी लावावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.05.06 18:36:06 +0530

(एस.एम.एच.शाहिद)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहेरी

दि.०६.०५.२०२६